# लेखिकेचे नाव - हर्षदा श्रीकांत देशपांडे

# कथेचे नाव - नॉनस्टिक

आज समोरच्या वहिनींच्या गॅलरीतले डबे भांडी लक्ष वेधून घेत होती.तांबे,पितळ,स्टील,प्लास्टीक,सगळ्या प्रकारचे सगळे डबे घासून,पूसून,लख्ख. त्यावर सूर्याची किरणे पडल्याने ती भांडी,डबे,खूपच चमकत होते.

जशा आम्ही दोघी समोरासमोर राहायला आलोय तसं बघतेय.वहिनींना भांड्याची कोण हौस.ज्या गावात जातील तिथून वेगळ्या प्रकारची,वेगळ्या आकाराची,वेगळ्या धाटणीची भांडी मिळतात,दिसतात ती घेऊनच येतात.त्यांच्याकडे कसल्याही निमित्तानं जेवायला बोलावलं सवाष्ण म्हणून की काहीतरी डबा,नाहीतर भांडे देणार.नवीन प्रकारचे.मला हौस नाही भांड्यांची.पण जी वेगळी भांडी दिसतात घरात ती त्यांनीच दिलेली. सगळे डबे ओळीत मांडलेले रॅकमधे.त्याच्या वरच्या झाकणांना प्लास्टिकचं कव्हर घालून छान नीटनेटके मांडलेले.वेगवेगळ्या प्रकारच्या कपबशा. हौशीने काढतील,वापरतील.

मला सगळं बघून वाटतं, ह्यांना एवढी हौस आणि एनर्जी कशी काय मिळते बाई.कारण मी अशाही काही जणी बघितल्यात की कपाटात डब्यांची गर्दी तर नाहीच पण किराणा सामानात ज्या वस्तु,जिन्नस येतात ते डब्यात काढायचे देखील कष्ट घेणार नाहीत.तशीच पुडकी ठेवायची.सामान वापरायचं. ती प्लास्टिकची पिशवी फेकून द्यायची.एवढं सोप्पं.ह्या वहिनी मात्र सगळं क्लिष्ट करतील.एवढं नीटनेटकं काम बघून मलाच टेन्शन येतं.त्या माझ्याकडे येणार म्हटलं की मलाच एक नजर घरावरुन फिरवावी लागायची.पसारा आत ठेवून किमान दार तरी लावूनच घ्यायचं.

वहिनींची राहणी पण अशीच स्वच्छ साधी,पण देखणी.सकाळी कामं होईपर्यंत एक साधी साडी मग कामं आवरली की छानशी साडी, डोक्यात एक तरी फूल माळणार.असं सगळं प्रसन्न. त्यांचे मिस्टरही त्यांना मदत करायचे.ते बघून आमचे हे काही मदत करत नाहीत म्हणून आमच्यात वाद ठरलेले. वहिनींना एकच मुलगा. बाहेरगावी नुकताच नोकरीत लागलेला.

काल परवाच म्हणाल्या,

' आता सून आणणार आणि हे सगळं तिच्या हाती सोपवलं की मी रिटायर होणार.मग शांतपणे फिरणार.'

खरंच? मी विचार करत होते.ह्या शांतपणे कधी कुठे पंधरा दिवसही गेल्या नाहीत.घरात त्या वस्तुंमधे एवढा जीव,की जातांना त्यांची सोय लावणार.मिस्टरांना शंभर सुचना. आल्यावर लगेच हे असे डबे,भांडी घासून गॅलरीत. हातात झाडू.

मग म्हणायच्या,'कुठे जाणं परवडतच नाही.'

आम्ही दोघी बोलत बसलो की मी गमतीने म्हणायची,अहो केवढा हा पसारा?? कमी करा. वरच्याचं बोलावणं आलं तर लगेच निघता यायला हवं.आपल्या मागे कोण आवरणार.पण त्यांना पटायचं नाही.म्हणतात,'माझ्या जीवात जीव असेपर्यंत असंच चालणार.सगळंच तर लागतं माणसाला.एक वस्तु कुणाकडून मागायला मला नाही आवडत. त्या

वरच्याचं नको सांगूस.त्याचा पसारा बघ केवढा आहे.त्याचा त्याला तरी आवरतोय का?त्याच्यापुढे माझा संसार काहीच नाही. हसायच्या मनमोकळं.'

सनीचं लग्न ठरल्याची आनंदाची बातमी कालच समजली. तो पुण्यात असतो.तिकडे पण वहिनींनी फ्लॅट बुक केलाय.

माझ्या डोक्यात विचार आला,आता सून आली की बराच पसारा ह्यांचा पुण्याला जाईल.बरं होईल ह्यांना जरा दुसरं काही सुचेल. सून नोकरीची आहे म्हणे. ह्यांच्यासारखं कसं जमेल तिला स्वच्छता ,टापटीप कुणास ठाऊक??

लग्न आटोपलं.मुलगी छान वाटली चुणचुणीत.हसरी.दोघंही दहा बारा दिवसांनी पुण्याला गेली.वहिनी जातांना बोलून गेल्या की एक चक्कर मारुन येते.मग सामान घेऊन जाईन. लावून देईन नवा संसार.

मलाच हुश्श झालं.मी म्हटलं,' सुनेच्या हातात किल्ल्या द्या आणि हे सगळं सामान द्या.आणि तुम्ही घर रिकामं करा आता.आणि पुन्हा नवीन काही घेऊ नका.'

पण जरा थकल्यासारख्या वाटल्या मला त्या. म्हणाल्या,'हो ग बाई आता फक्त तिच्या सुपूर्द करते.आणि मग शांतपणे बसते निवांत.तिची आई काही सामान देणार आहे म्हणे.त्यांनी काय दिलं ते बघून येते.'

वहिनी पंधरा-वीस दिवस दिसल्याच नाहीत.गुंगल्या बहुतेक सुनेचा संसार लावण्यात.मलाच हायसं वाटलं.

पण काल ओझरत्या दिसल्या.ती लगबग ती आल्याबरोबरची आवरासावरी,स्वच्छता काहीच दिसेना.सामानाचं पॅकिंग करत असतील.आता तिकडे बघून आल्यात.तर त्यातच व्यस्त असणार.जरा चार,पाच दिवसांनी चक्कर मारु म्हटलं. कारण गेल्यावर भरभरून बोलतील.खायला घातल्याशिवाय सोडणार नाहीत.माझं आणि त्यांचं चांगलच गुळपिट आहे हे सुनेच्याही लक्षात आलं होतं.सगळं मनातलं बोलतो आम्ही एकमेकींशी.जरा निवांतपणे जाऊ असं ठरवून मनावर संयम ठेवला होता.

आता आज दुपारी निवांत बसायलाच जाणार आहे.लग्नात प्रेझेंट घेतलं नाही.पण आज मी ते नेणार होते.मी छान गारगोटीचा मस्त डिनरसेट ऑर्डर केला होता.त्यांना स्वच्छ पांढऱ्या रंगाची आवड आहे म्हणून.अगदी सुबक असा.त्या पाहूनच खुश होणार.असा विचार करुन दुपारीच तो घेऊन गेले त्यांच्याकडे.दार वाजवलं .जरा वेळाने दार उघडलं .घरात जरा हिरमुसलेली शांतता जाणवली.माझ्या हातात एवढं मोठं खोकं बघून वहिनींच्या चेहे-यावर मला पुसटशी अढी दिसली.मी आत शिरले.घरात आम्ही दोघीच.त्या सोफ्यावर टेकल्या.मीच सुरूवात केली,काय म्हणतेय सून?लागलं का घर?पण सामान तर अजून इथेच आहे.काही जीव ठेवू नका.तिला हवं ते देऊन टाका.नवीन नवीन हौस असते.

त्यांचा चेहरा केविलवाणा दिसला.डोळे भरुन आहे.मला एकदम चरर्‌ झालं.उठून त्यांच्या शेजारी बसले.तर रडायलाच लागल्या. सर्वस्व हरवल्यासारख्या.

भडाभडा बोलायला लागल्या.म्हणाल्या,' तू मला किती वर्ष बघते आहेस ना.कितीवर्ष तिळतिळ करुन संसार हौशीने जमवला.उधळमाधळ केली नाही.स्वच्छता, सगळं टापटीप करत राहिले.पण हे ही मनाशी ठरवलं होतं.सनीच्या

बायकोच्या हाती सगळा संसार, वस्तु, भांडी द्यायची.त्यात त्यांना पैसा खर्च करायला नको.थोडी थोडी भांडी वेगळी पण काढत होते.माझा त्यात खूप जीव.पण सनीपण माझा जीवच ना? ते पुण्याचं घरही माझंच.ते पण छान लावून देणार होते...

पण तिथे गेले.तिची आई पण आलेली होती.अग सनीने बायकोच्या मनाप्रमाणे इंटेरिअरचे काम करुन घेतले होते.ते कधी ते समजलेच नाही.आश्चर्य तिथेच वाटले.अग ह्याला स्वयंपाकघरात कधीच रस नव्हता पण छान पोपटी,गुलाबी कलरच्या कॉम्बीनेशनचं सगळं केलं . मी गेले त्याच्या दुसऱ्या दिवशी पासूनच ऑनलाईन एक-एक वस्तु यायला लागली.तिची आई म्हणाली, आम्ही ते रुखवत वगैरे काही ठेवलं नव्हतं ना.तिला काय हवं ते हौशीने तिलाच विचारुन मागवू म्हटलं. ' आई, आम्ही सगळ्या मॅचींग वस्तु मागवणार आहोत.पोपटी आणि गुलाबीच.आमची तीच थीम ठरवलीय आम्ही'सूनबाई म्हणाली. 'आई,आपल्या त्या घरातलं मला काहीच नकोय हं.तुम्ही एवढं हौशीने घेतलंय तुम्हालाच राहू दे.एखादे पितळीचे घंघाळ वगैरे छोटे मी अँटीकपीस म्हणून ठेवेन हॉलमधे.बाकी ते सगळं आता ओल्ड फॅशन झालंय ना.आई,आणि मम्मा ऐका आता. खूप वर्ष काही ठेवायचं नसतं.खूप नवीन नवीन येतं बाजारात.युज अँड थ्रो चा जमाना आहे.कशातच जीव अडकवायचा नाही. एन्जॉय करायचं.वस्तू वापरली एकदा की तिचा युज संपतो.लगेच फेकायचं आणि विसरायचं.

ती बोलत होती...आई तुम्ही केवढं सामान साठवलं आहे.ते कमी करा.तुम्हाला आता आवरणं नाही होणार.आणि मी तर येऊच शकणार नाही. तुम्ही जेव्हा इकडे याल,पाच दहा वर्षांनी तेव्हा नुसतेच या.फक्त कपड्यांची बॅग घेऊन.तिकडचं सगळं सामान ठेवणार कुठे आपण. फ्लॅट लहान असतात आता.माणसेच जेमतेम मावतात.

मी सुन्न होऊन ऐकत होते.'नवीन सामानाने घर सजेलेलं.मी निघून आले बाई.हे सामान मला वाकुल्या दाखवतंय.हसतंय माझ्याकडे बघून.मी काय करु ह्याच आता?मला आवरणं नाही होत ग?पण खूप जीव आहे माझा त्यात.'

मी काय बोलू?

दोन पिढ्यांची ही लढाई.हल्ली सगळीकडेच दिसते.काय व्हायला हवं होतं.कुणी धरायला आणि कुणी सोडायला हवंय काहीच कळेनासं झालंय. सगळीकडे असं दिसतं की नाती असो वा व्यवहार दोघात असतो.तो रबरासारखा हवा लवचिक.पण हेच रबर दोघांनी व्यवस्थित ताणलेलं असतं तोपर्यंत लवचिकता दिसते.पण एकाने सोडून दिलं की ज्याने घट्ट पकडलंय त्याला मार बसतो त्या रबराचा.

एकाने थोडं सोडायचं ,दुसऱ्याने ते घट्ट पकडायचं तर रबर तुटत नाही मार बसत नाही.

वहिनींच चुकलं की सुनेचं?

तिची आई बरोबर की सनीची आई.हे प्रश्न अधांतरी लटकत राहिले.

मी सुन्नपणे घरी आले.मी ह्यातून काय शिकू??

मी जर वहिनींकडून काही शिकले आणि काही जमवलं नाही आणि सुनेला काही दिलं नाही तर 'मी संसार थाटला तेव्हा सासूने एक फुटकी कवडी दिली नाही आणि आम्हाला पोळपाट लाटण्यापासूनच सगळं घ्यावं लागलं' अशी पण

सांगणारी मंडळी आजूबाजूला आहेत.जमवून ठेवलं द्यायची इच्छा असली तरी ते नकोय.मग काय करायचं? आणि सगळ्या मुलींच्याच आयांच्या सल्ल्याने संसार होणार असतील तर फक्त मुलं असणाऱ्यांनी कुणाला सल्ले द्यायचे?

खूप खूप प्रश्न, विचार,कसरत आहे ना सगळी?

दोन पिढ्यात काहीतरी पूल हवाय .साधा लाकडी पूलही चालतो .पण मजबूत हवा.सिमेंटकाँक्रीटचा ओव्हरब्रीजच हवा असंही नाही.सिमेंटचा पूल वाट करुन तर देतो.पण आजूबाजूचं खूप उध्वस्त होतं तसं ही नको वाटतं केविलवाणं.

कुठेतरी सहलीला गेल्यावर एक पूल बघितला होता.दोन झाडांची मुळं एकत्र झाली होती. एवढा मजबूत आणि भक्कम पूल तयार झाला होता .त्यावरून लोक ये-जा करत होते.ते एक पर्यटनाचं ठिकाण झालं होतं.(मेघालयात बघितलं बहुतेक) असा पूल,मुळांच्या एकत्र गुंफून येण्याने झाडं करू शकली. आपण करु शकू का?

ह्यावर्षी खूप झाडं लावायचा संकल्प आहे.तो पारही पडतोय.पण त्यांची मुळं जमिनीत रुजवतांना त्यांच्याकडून हे ही शिकूया.रुजलेल्यांना उखडून टाकायचं नाही.नवीन रुजणा-यांनी मुळात मुळं गुंफायची आणि नात्यांचा घट्ट पूल बांधायचा.होईल का?

आज वहिनींचा फोन आला .दुपारी बाजारात जाऊया का? तांब्या- पितळीची मोड देऊन टाकते.मेंटेंन करायला अवघड आहेत ती भांडी.आणि त्या पैशात सूनेला नवीन हवं ते घे म्हणते..

ती नवीन भांडी आलीत ना..नॉनस्टिक.ज्याला काहीच चिकटून बसत नाही.अशी...

त्यांना होकार कळवला...आणि माझ्या कामांकडे वळले..लवकर लवकर आवरायला हवं...

# समाप्त